ePaper भाजपचं मिशन लोकसभा, मुंबईकरांना घडवणार रामलल्लांचे दर्शन!



| वर्ष - 7 | अंक - 264 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- इंग्लंडचा १०६ धावांनी उडवला धुव्वा!
- बेबी जॉन'चा खतरनाक फर्स्ट लूक
- भाजपाला अब की बार ४०० पार
- धरणं फोडणारे खेकडे एकत्र तिकडे गेले


www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 06 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गुंड पेरॉलवर!

## » विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची सरकारवर टीका

| पिंपरी | महाईन्यूज

**पुणे आणि पिंपरी- चिंचवडच्या पोटनिवडणुकी वेळी तुरुंगातून अनेक गुंडांना सोडवण्यात आले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हॉटेलमध्ये जाऊन भेटीगाठी घेतल्या, याची माहिती आमच्याकडे आहे. त्या गुंडांची चौकशी झाली पाहिजे. सर्रास या गुंडाचा वापर निवडणुकीत होतो, तुरुंगात असणारे गुंड पेरॉलवर सोडले जात आहेत. सर्वसामान्य जनतेच्या मनात धाक निर्माण करायचा आणि राजकीय हित साधायचे, असा आरोप विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी भाजप-शिंदे सरकारवर केला. आकुर्डीत शिवसेना (ठाकरे गट) यांचा जनता दरबार झाला. यावेळी दानवे यांनी माध्यमांशी संवाद साधला. दानवे म्हणाले, मराठा समाजाची या सरकारने फसवणूक केली आहे. म्हणूनच आज मनोज जरांगे यांच्यावर पुन्हा उपोषणाला बसण्याची वेळ येते आहे. ओबीसी आणि मराठा समाजात तेढ निर्माण करण्याचा हा प्रयत्न सुरू आहे. छगन भुजबळ यांना त्यांच्याच पक्षाने सोडलेलं आहे, हे त्यांना कळत आहे.**





### फडणवीस यांचा वचक नाही...

दानवे म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांचा बॉस वर्षा आणि सागर बंगल्यावर बसल्याने लोकांना गोळ्या घालतायत, जीव घेतायत, गुंडांच्या गळ्यात गळे घालत आहेत. गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचा वचक राहिला नाही.

महराष्ट्रात फडणवीस यांच्या कायदा सुव्यवस्थेवर धाक राहिला नाही. केवळ राजकारणात गुंतलेले आहेत. सध्या ज्यांच्यावर आरोप आहेत, त्यांनाच ते विनंती आणि अर्ज करतायत, ज्यांनी पन्नास खोके देऊन आमदार फोडले त्यांना तुम्ही काय तक्रार करणार? असेही दानवे म्हणाले.

### गुंडाचं उदात्तीकरण होत आहे...

दानवे म्हणाले, भाजप आमदारच गोळीबार करतोय, ज्याला गोळ्या घातल्यात तोही धुतल्या तांदळाचा नाही. मुख्यमंत्र्यांचे सुपुत्र हे वर्ष बंगल्यावर पुण्यातील कुख्यात गुंडा भेटतात, तेच उत्तर देतील. तपासणी करून आत सोडतात, तरीही आशा प्रकारे गुंड जात असेल तर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. पुण्यातील गुंडांचे उदात्तीकरण केलं जात आहे. हे चुकीचे आहे, असे गुंड मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर जात असतील तर हे राज्य गुंडांचे आहे, असा आरोपही दानवे यांनी केला.

### सभागृह न उघडल्यानं पालिका प्रवेशद्वारावरच दानवेंची पत्रकारपरिषद

शिंदे सरकारच्या 'शासन आपल्या दारी' या उपक्रमाच्या धर्तीवर शिवसेना ठाकरे गटानं ( THACKERAY GROUP ) 'जनता दरबार' सुरू केला आहे. सोमवारी ( 5 फेब्रुवारी ) पिंपरी-चिंचवडमध्ये ठाकरे गटाचा 'जनता दरबार' पार पडला. यावेळी आकुर्डीतील नागरिकांनी जनता दरबारात महापालिकेशी संबंधित तक्रारी केल्या. त्यानंतर पालिका आयुक्त तथा प्रशासक शेखरसिंह यांची भेट घेऊन दानवे प्रसारमाध्यमांशी संवाद साधणार होते. पण, स्थायी समितीचे दालन न उघडल्यानं पालिकेच्या प्रवेशद्वारावरील पायऱ्यांवर दानवेंनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी दानवेंनी शिंदे सरकारवर हल्लाबोल केला.

"मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार घेत असलेल्या 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम म्हणजे सरकारी खर्चाने ते जाहिरात आणि स्टंटबाजी करीत आहेत. 'शासन आपल्या दारी' येते म्हणजे कुणाच्या दारी जाते?" अशी खोचक विचारणा करत दानवे म्हणाले, "जनतेचे प्रश्न जसेच्या तसे राहिल्याने शिवसेनेनं 'जनता दरबार' सुरु केला आहे."

### "प्रशासनाची मनमानी अन् मग्रुरी दिसली"

**» दरम्यान, आकुर्डी येथील जनता दरबारात पिंपरी-चिंचवड महापालिकेशी संबंधित तक्रारी आल्यानंतर दानवेंनी आयुक्त तथा प्रशासक शेखरसिंह यांची महापालिका मुख्यालयात भेट घेतली. त्यानंतर दानवे मुख्यालयात पत्रकार परिषद घेणार होते. पण, स्थायी समितीनं तिसऱ्या मजल्यावरील दालन न उघडल्यानं महापालिकेच्या प्रवेशद्वारावरील पायऱ्यांवर त्यांना पत्रकारांशी संवाद साधावा लागला. "यातून प्रशासनाची मनमानी, मग्रुरी दिसली," अशी संतप्त प्रतिक्रिया दानवेंनी व्यक्त केली.**

### " ...म्हणून 203 तक्रारी माझ्याकडे"

**» "पिंपरी-चिंचवडमधील आमदार फक्त 'टीडीआर'सारख्या घोटाळ्यात गुंतलेले असल्यानं जनतेच्या प्रश्नांकडे त्यांचं दुर्लक्ष झालेले आहे. अतिक्रमण, आरोग्य, पाणी, शिक्षण आदी शहरातील प्रश्न तसेच राहिल्याचं दिसून आले. त्यामुळे २०३ तक्रारी माझ्याकडे आल्यात," असं दानवेंनी म्हटलं.**

### "सरकार मराठा समाजाच्या भावनांशी खेळत आहे"

"मराठा समाजाला मोठ्या लढ्यातून थोडं यश मिळालं आहे. त्यातही विषय कालवण्याचा प्रयत्न मंत्री छगन भुजबळ करीत आहेत. आरक्षणासाठी चिकाटीनं आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगेंचा मराठा समाजाला अभिमान आहे. सरकारनं मराठा समाजाची आरक्षणप्रश्नी फसवणूक करण्याचा प्रयत्न केला आहे. सरकार मराठा समाजाच्या भावनांशी खेळत आहे. त्याचे परिणाम येणाऱ्या निवडणुकीत दिसतील," असा इशारा दानवेंनी दिला आहे.

# आम्हीही लढू, रोहित पवारांचं ओपन चॅलेंज!

## लोक आपल्याला स्वीकारणार नाहीत ही अजित पवारांनी भीती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बारामती लोकसभेच्या निवडणुकीतसुप्रिया सुळे यांच्या विरोधात अजित पवार त्यांच्याच कुटुंबातील एका व्यक्तीला उभा करतील असा मोठा दावा राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. अजितदादांनी बारामतीमध्ये रविवारी जे भाषण केलं त्यामध्ये अहंकार दिसत होता असंही ते म्हणाले. रोहित पवारांच्या या दाव्यानंतर आता अजित पवारांसोबतचा त्यांच्या संघर्षाला अधिक धार येण्याची चिन्हं आहेत. बीडमध्ये एका कार्यक्रमानंतर रोहित पवारांनी माध्यमांशी संवाद साधताना हा दावा केला.**

रोहित पवारांनी अजित पवारांवर सडकून टीका केली. ते म्हणाले की, बारामती लोकसभेच्या निवडणुकीत सुप्रिया सुळे यांच्या विरोधात अजित पवार त्यांच्या कुटुंबातीलच एका व्यक्तीला तिकीट देतील आणि सुप्रिया सुळे यांच्या विरोधात निवडणुकीत उभं करतील. अजित पवार यांनी काल जे भाषण केले त्या भाषणामध्ये त्यांच्यातला अहंकार दिसत होता. त्यामुळे सत्तेमध्ये राहून अजित पवार हे स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तीला निवडून आणतील, मात्र आम्ही लोकांना विश्वासात घेऊन या बलाढ्य शक्तीसोबत लढत राहू. बीड येथील रयत शिक्षण संस्थेच्या कंकालेश्वर महाविद्यालयाच्या नवीन इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी रोहित पवार बीडमध्ये आले होते. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी पहिल्यांदाच बारामती लोकसभा निवडणुकीवर भाष्य केलं. अजित पवार यांच्या कुटुंबातील एक व्यक्ती सुप्रिया सुळे यांच्या विरोधात उभा राहील, भाजपला पवार कुटुंबात फुट पडावी अशी भाजपची इच्छा असल्याचा दावा रोहित पवारांनी केला. आमदार रोहित पवार यांच्या हस्ते आज बीडमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या कंकालेश्वर महाविद्यालयाच्या नवीन इमारतीच





उद्घाटन करण्यात आलं.. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलताना रोहित पवार यांनी अजित पवार यांच्यावर जोरदार टीका केली तर ईडीच्या कारवाईला देखील घाबरत नसल्याचं रोहित पवार यांनी स्पष्ट केल. बारामती लोकसभा निवडणूक लढवणार आणि जिंकणार असा दावा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला आहे. तसेच बारामतीच्या लोकांनी आतापर्यंत वरिष्ठांचं ऐकलं, आता माझं ऐकावं असं आवाहनही अजित पवारांनी केलं होतं. बारामतीच्या लोकांनी विधानसभेला एक आणि लोकसभेला एक असं मतदान करू नये, दोन्हीवेळाही आपल्याला मतदान करावं असं आवाहन अजित पवारांनी केलं. भाषणामध्ये अजित पवार यांनी शरद पवार यांच्याबद्दल जे वक्तव्य केले आहे त्याची मला अपेक्षा नव्हती असं रोहित पवार म्हणाले. आम्ही ज्या दादांना ओळखतो ते दादा आता राहिलेले नाहीत, भाजपमध्ये जाऊन ते भाजपच्या विचारावर चालत आहेत. दिल्लीतले लोक खूश व्हावेत यासाठी ते शरद पवार यांच्यावर नेहमी टीका करतात, त्यांच्या वयाचा उल्लेख करतात. सत्तेमध्ये असलेल्या अजितदादा यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोललं पाहिजे, युवकांच्या प्रश्नावर बोललं पाहिजे, बेरोजगारी कशी संपवता येईल यासाठी त्यांनी लोकांना विश्वास दिला पाहिजे, मात्र लोक आपल्याला स्वीकारणार नाहीत या भीतीने ते सातत्याने शरद पवार यांच्यावर टीका करत आहेत. भाजपमध्ये गेल्यामुळे त्यांना देखील भाजपच्या व्हायरसची लागण झाल्याचे रोहित पवार म्हणाले. ईडीच्या कारवाईवर बोलताना रोहित पवार यांनी भाजपवर निशाणा साधला. ते म्हणाले की, गरज नसतानाही सध्या ईडीच्या चौकशीला मला सामोरे जावे लागत आहे. निवडणुका जवळ आल्याने राजकीय द्वेषापोटी माझ्यावर ईडीची कारवाई केली जात आहे. माझ्यावर कारवाई करतील, मला अटक करतील. तरी देखील मी मैदान सोडणार नाही , माझे विचार सोडणार नाही. रोहित पवारांनी अजित पवारांवर सडकून टीका केली.बारामती लोकसभेच्या निवडणुकीत सुप्रिया सुळे यांच्या विरोधात अजित पवार त्यांच्या कुटुंबातीलच एका व्यक्तीला तिकीट देतील आणि सुप्रिया सुळे यांच्या विरोधात निवडणुकीत उभं करतील. आम्ही लोकांना विश्वासात घेऊन या बलाढ्य शक्तीसोबत लढत राहू. बीड येथील रयत शिक्षण संस्थेच्या कंकालेश्वर महाविद्यालयाच्या नवीन इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी रोहित पवार बीडमध्ये आले होते

### लढवणार आणि जिंकणार

» लोकसभा निवडणुकीवर भाष्य केलं. अजित पवार यांच्या कुटुंबातील एक व्यक्ती सुप्रिया सुळे यांच्या विरोधात उभा राहील, भाजपला पवार कुटुंबात फुट पडावी अशी भाजपची इच्छा असल्याचा दावा रोहित पवारांनी केला. आमदार रोहित पवार यांच्या हस्ते आज बीडमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या कंकालेश्वर महाविद्यालयाच्या नवीन इमारतीच उद्घाटन करण्यात आलं.. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलताना रोहित पवार यांनी अजित पवार यांच्यावर जोरदार टीका केली तर ईडीच्या कारवाईला देखील घाबरत नसल्याचं रोहित पवार यांनी स्पष्ट केल. बारामती लोकसभा निवडणूक लढवणार आणि जिंकणार असा दावा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला आहे.

# स्वाती मोहोळ यांना पुन्हा जीवे मारण्याच्या धमक्या

## गणेश मारणे याच्यापासून जीवाला धोका, स्वाती मोहोळ यांचा दावा

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शरद मोहोळहत्या प्रकरणातील आरोपी मुन्ना पोळेकर याच्या नावाने स्वाती मोहोळ यांना पुन्हा जीवे मारण्याच्या धमक्या आल्या आहेत. सोशल मीडियाप्लॅटफॉर्मवर मुन्ना पोळेकरच्या नावाने अकाऊंट बनवत स्वाती मोहोळ यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. स्वाती मोहोळ यांना मेसेज करुन आणि आक्षेपार्ह पोस्ट करत हा प्रकार केलाय.**





मुन्ना पोळेकर हा शरद मोहोळहत्या प्रकरणातील मुख्य आरोपी आहे. काही दिवसापूर्वीच पुण्यात कुख्यात गुंड शरद मोहोळची गोळ्या झाडत करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणात पोलिसांचा तपास सुरुच आहेत. शरद मोहोळची पत्नी काही दिवसांपूर्वी माध्यमांसमोर आली होती. माझ्या पतीच्या जाण्याने मी खचणार नाही, असेही तिने स्पष्ट केले होते. शरद मोहोळची पत्नी स्वाती मोहोळ आणि फिर्यादी अरुण धृपद धुमाळ यांनी गणेश मारणे आणि विठ्ठल शेलार यांच्यापासून जीवाला धोका असल्याची माहिती पोलिसांना दिली होती. तपास अधिकारी सहायक पोलीस आयुक्त सुनील तांबे यांनी गुरुवारी न्यायालयात याबाबतची माहिती दिली होती. दरम्यान आता अजून एकदा जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा दावा स्वाती मोहोळने केलाय. शरद मोहोळच्या लग्नाचा वाढदिवशी त्याच्या आयुष्याची दोरी कापली गेली होती.तिघांनी त्यांच्याजवळील पिस्तुलातून झाडलेल्या गोळ्यांपैकी दोन गोळ्या शरद मोहोळच्या मानेत लागल्या, एक छातीत तर एक गोळी शरद मोहोळच्या डोक्यात लागली. काही कळायच्या आत पुण्याच्या गुन्हेगारी विश्वात गेली दीड दशके दहशत असलेला शरद मोहोळ रक्ताच्या थारोळ्यात पडला.

### मुन्ना पोळेकरच्या नावाने अकाऊंट

» शरद मोहोळहत्या प्रकरणातील आरोपी मुन्ना पोळेकर याच्या नावाने स्वाती मोहोळ यांना पुन्हा जीवे मारण्याच्या धमक्या आल्या आहेत. सोशल मीडियाप्लॅटफॉर्मवर मुन्ना पोळेकरच्या नावाने अकाऊंट बनवत स्वाती मोहोळ यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. स्वाती मोहोळ यांना मेसेज करुन आणि आक्षेपार्ह पोस्ट करत हा प्रकार केलाय. तिघांनी त्यांच्याजवळील पिस्तुलातून झाडलेल्या गोळ्यांपैकी दोन गोळ्या शरद मोहोळच्या मानेत लागल्या, एक छातीत तर एक गोळी शरद मोहोळच्या डोक्यात लागली. काही कळायच्या आत पुण्याच्या गुन्हेगारी विश्वात गेली दीड दशके दहशत असलेला शरद मोहोळ रक्ताच्या थारोळ्यात पडला.

# भुजबळ यांच्यावर गुन्हा दाखल करा!

## मराठा क्रांती मोर्चाची मागणी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाच्या हजामती करू नका म्हणत दोन समाजामध्ये सामाजिक तेढ निर्माण केल्याप्रकरणी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्यावर कारवाई करण्याची मागणी मराठा क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते सतीश काळे यांनी केली. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा काळे यांनी दिला आहे. पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांना दिलेल्या निवेदनात काळे यांनी ही मागणी केली आहे.**

सतीश काळे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मराठा समाज आपल्या आरक्षणासाठी संविधानिक मार्गाने लढा देत आहे. इतर समाजाला न दुखावता आरक्षणाचा हक्क मिळावा, यासाठी शासकीय स्तरावर पाठपुरावा करत आहे. असे असताना काही जण मराठा समाजाच्या विरोधात इतर समाजाच्या मनात द्वेष निर्माण करण्याचे काम करत आहे. महाराष्ट्र राज्य सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यामध्ये मोठी कळीची भूमिका बजावत आहे. नुकतेच त्यांनी अहमदनगर येथे ओबीसी भटके विमुक्त एल्गार सभेत मराठा समाजाच्या विषयी चुकीची वक्तव्य करत नाभिक समाज बांधवांना आवाहन केले की, मराठा समाज बांधवांची केस आणि दाढी करू नये, त्यांच्यावर बहिष्कार टाका.

बहिष्कार टाकण्याची भाषा करत दोन समाजामध्ये दुही पसरवून सामाजिक तेढ निर्माण केल्याबद्दल मंत्री छगन भुजबळ यांच्यावर कायदेशीर कारवाई करा. तसेच राज्य सरकारने त्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी. मंत्री छगन भुजबळ हे समता परिषदेच्या माध्यमातून ओबीसी बांधवांसाठी काम करत असल्याचा दिखावा करत आहे. दोन समाजामध्ये भांडणे लावून कोणती समता भुजबळ आणत आहेत, हे आधी त्यांनी स्पष्ट करावे.




### अन्यथा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने तीव्र आंदोलन

» भुजबळ यांच्या कोणत्याही प्रलोभनांना, भाषणांना आता ओबीसी बांधवांनी बळी पडू नये असेही आवाहन काळे यांनी केले आहे. तसेच समाजासमाजामध्ये द्वेष निर्माण केल्याबद्दल त्वरित मंत्री भुजबळ यांच्यावर गुन्हा दाखल करावा. अन्यथा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा काळे यांनी दिला.

---

# मावळ तालुक्यात शासन आपल्या दारी उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

## वडगाव येथील भेगडे लॉन्स येथे आयोजन, आ. सुनील शेळके यांच्या संकल्पनेतून अभियान

। वडगांव मावळ । प्रतिनिधी : महाईन्यूज

**शासन स्तरावर जनकल्याणाच्या अनेक योजना राबविण्यात येत असतात.सदर योजनांची प्रचार-प्रसिद्धी करून या योजनांसाठी जनजागृती केली जाते.मात्र नागरिकांना शासकीय कार्यालयामध्ये येणे, योजनांची सविस्तर माहिती घेणे, योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे जमा करणे अशा विविध प्रक्रियेतून जावे लागते. यामुळे नागरीकांना मनस्ताप सहन करावा लागतो. शासनाच्या योजना, तसेच विविध उपक्रमांची माहिती एकाच छताखाली सहजरित्या उपलब्ध व्हावी, यासाठी मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या संकल्पनेतून तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला, जेष्ठ नागरिक यांचे प्रश्न त्वरित निकाली काढण्यासाठी ५ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारीपर्यंत भेगडे लॉन्स येथे शासन आपल्या दारी हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानास पहिल्याच दिवशी मावळवासियांकडून तुफान प्रतिसाद मिळत आहे.**





यासाठी नागरिकांना कागदपत्रे उपलब्ध करुन देणारी शासनाची कार्यालये ही वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना अनेक कार्यालयात जावे लागते. तसेच सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास त्या दूर करण्यासाठी वारंवार त्या कार्यालयांमध्ये जावे लागते.काही वेळा अनेक लोकांना शासनाच्या योजनांची माहिती नसते आणि माहिती असुनही योजनांचा लाभ गरजू व्यक्तीपर्यंत पोहोचू शकत नाही. त्यामुळे या योजनांचा खरा उद्देश साध्य होत नाही. त्यामुळे या अभियानातून सर्वसामान्यांच्या समस्या सोडविण्यावर भर दिला जात आहे.

### एकाच छताखाली सर्व समस्यांचे निराकरण

या अभियानात महसूल, कृषी, महावितरण,पाटबंधारे, वन विभाग पंचायत समिती, भूमी अभिलेख तसेच महा-ई-सेवा केंद्र तसेच विविध दस्तावेज उपलब्ध करून देणारे या विभागांचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामसेवक, तलाठी सहभागी झाले असल्यामुळे नागरिकांच्या समस्यांचे निराकरण एकाच ठिकाणी होत आहे.

शासन आपल्या दारी या अभियानाद्वारे नागरिकांना असलेल्या सवलती नागरिकांना समजल्या पाहिजेत.प्रत्येक योजनेचा लाभ प्रत्येक नागरिकाला मिळायलाच हवा यासाठी हे अभियान राबवले जात आहे. केवळ शहरातीलच नागरिकांना नाही तर ग्रामिण भागातील नागरिकांनादेखील याचा लाभ मिळायला हवा. हाच या अभियानाचा उद्देश आहे.

### आमदार महोदय ऑन दी स्पॉट अन अधिकाऱ्यांकडून कामाचा निपटारा...

मावळ तालुक्यातील 103 ग्रामपंचायती असून, पहिल्याच दिवशी 14 ग्रामपंचायतीच्या हद्दीतील नागरिकांची विविध शासकीय कामे युद्धपातळीवर मार्गी लावण्यात आली. ग्रामीण भागातील येण्या-जाण्याची तसेच नाष्ट्यासह जेवणाचीदेखील सोय आमदार शेळके यांनी केली आहे. आ. सुनील शेळके स्वतः वडगांवमधील भेगडे लॉन्स येथे प्रवेशद्वाराजवळ टेबल लावून बसले. ते स्वतः लक्ष घालून कुणाला काही अडचण तर येत नाही ना याची पाहणी तसेच विचारपूस करत आहेत.

> “ मावळ तालुक्यातील गाव निहाय आपण शासन आपल्या दारी हे अभियान एकाच छताखाली राबविण्यात येत आहे. तालुक्यातील सर्व नागरीकांना सर्व समाज घटनकांना शासकीय योजनेचा लाभ मिळावा, ज्या काही सवलती आहेत त्या प्रत्येकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. या करिता हे अभियान सुरू करण्यात आले आहे. कुसगावपासून पवन मावळातील तुंग तिकोण्यापर्यंत आंदर मावळातील तुमरस लोणीपासून ते खांडी सावळापर्यंत संपूर्ण गाव, वाडी, पाडा नागरीकांकरिता या योजनेचा लाभ होणार आहे. संपूर्ण ग्रामिण भागातील नागरिकांकरिता भेगडे लॉन्स या ठिकाणी सर्व विभाग पंचायत समितीतील जेवढे विभाग, मतदार नोंदणी विभाग, पाट बंधारे विभाग, महसूल विभाग, वन विभाग, अन्नधान्य पुरवठा विभाग, महावितरण विभाग, उज्वला गॅस योजना, रमाई आवास योजना या सर्व योजनांच्या विभागाचे अधिकारी या ठिकाणी उपलब्ध आहेत. रोज ग्रामपंचायती हद्दीमध्ये येणाऱ्या नागरिकांनाच या ठिकाणी बोलावण्यात आले आहे. या ठिकाणी आलेल्या प्रत्येक नागरीकाचे काम झालेच पाहिजे, अशी व्यवस्था या ठिकाणी करण्यात आलेली आहे. या गोष्टीचे समाधान वाटतेय की, नागरीकांनी आमच्यावर जो विश्वास दाखवून या ठिकाणी आले आहेत. त्यांचे 90 टक्के काम हे पूर्ण करून देण्यावर आमचा भर असेल. - **आमदार सुनील शेळके**




# युक्रेनच्या मदतीस युरोप

**युद्धजर्जर युक्रेनला ५० अब्ज युरो किंवा ५५ अब्ज डॉलरच्या तातडीच्या मदतीला युरोपीय समुदायाने मंजुरी दिली. ही मदत पुरेशी आहे किंवा नाही याची चर्चा करण्याआधी, ऐन मोक्याच्या वेळी ती युक्रेनचे धैर्य वाढवणारी आहे हे मान्य करावे लागेल. येत्या २४ तारखेस युक्रेनवर रशियाने केलेल्या हल्ल्यास दोन वर्षे पूर्ण होतील.**

हे युद्ध संपण्याची कोणतीही चिन्हे नाहीत आणि त्याची व्याप्ती किती वाढेल याची शाश्वती नाही. वास्तविक रशियाने २०१४मध्येच क्रीमियावर अवैध ताबा मिळवत तो प्रांत रशियाशी संलग्न केला. याच प्रकारे युक्रेनचे आणखी दोन प्रांत गिळंकृत करत युरोपात पुढे सरकण्याचा व्लादिमीर पुतिन यांचा डाव युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की आणि युक्रेनच्या जनतेने हाणून पाडला. अनेक महत्त्वाच्या शहरांमधून रशियन फौजांना मागे रेटण्यात युक्रेनच्या लष्कराला यश आले आहे. काळय़ा समुद्रात रशियन आरमारालाही तुटपुंज्या सामग्रीनिशी बेजार करून युक्रेनने काही संस्मरणीय विजय संपादले आहेत. पण हा प्रतिकार फार काळ टिकू शकणार नाही, याची जाणीव युक्रेनला आणि युरोपीय समुदाय तसेच अमेरिकेला आहे. युक्रेन हा युरोपीय महासंघाचा सदस्य नाही आणि उत्तर अटलांटिक करार संघटनेचाही (नेटो) सदस्य नाही. त्यामुळे चौकटीबाहेर आणि



तात्पुरत्या स्वरूपात मदत पुरवत राहणे हा युक्रेनला साह्य करण्याचा एक मार्ग. दुसरा मार्ग अर्थातच कायदेमंडळामध्ये प्रस्ताव संमत करून मदतनिधी पाठवण्याचा. यात अमेरिकेवर युरोपने आघाडी घेतलेली दिसते. कारण ६० अब्ज डॉलरच्या अमेरिकी मदतीचा प्रस्ताव अमेरिकी काँग्रेसमध्ये डेमोक्रॅट्स आणि रिपब्लिकन यांच्यातील तीव्र मतभेदांमुळे अडकून पडला आहे.५० अब्ज युरोची मदत युक्रेनला चार वर्षांत वितरित केली जाईल. खरे म्हणजे अशा प्रकारची मदत त्या देशाला देण्याविषयी खल अनेक महिने सुरू होता. युक्रेनला कबूल केलेली मदत युरोपीय समुदायाच्या वार्षिक अंदाजपत्रकात निर्धारित केली जाणार होती. परंतु युरोपीय समुदायाच्या नियमानुसार, या निर्धारणेविषयी सर्व २७ सदस्यांचे मतैक्य होणे आवश्यक असते. नेमके याच ठिकाणी हंगेरीचे पंतप्रधान विक्तोर ओरबान यांनी घोडे अडवून धरले. ते पुतिन यांचे मित्र. त्यांना मदत रोखून धरण्याची तशी काही गरज नव्हती. पण युरोपमध्ये आपल्या नावाला वजन प्राप्त व्हावे, इतकी त्यांची माफक पण भंपक अपेक्षा. त्यांच्या वेडगळपणामुळे लाखोंचे जीव पणाला लागले होते. अखेरीस अनेक युरोपीय नेत्यांनी त्यांना जबाबदारीचे भान आणून दिले आणि युक्रेनला मदत करणे किती महत्त्वाचे आहे, हे पटवून दिले. मात्र या महिन्यात या मदतीला अंतिम मंजुरी देण्याच्या प्रक्रियेतही ओरबान खोडा घालण्याची शक्यता नाकारता येत नाही.ही मदत वरकरणी मोठी दिसत असली, तरी युरोपीय समुदायातील देशांच्या एकूण आर्थिक ताकदीच्या तुलनेत फुटकळ आहे. युरोपीय समुदायाच्या चार वर्षांतील सकल एकत्रित उत्पादनाच्या ती ०.०८ टक्केच ठरते. एस्टोनियाच्या पंतप्रधान कात्या कलास यांनी सुचवल्यानुसार, प्रत्येक देशाने आपापल्या जीडीपीच्या ०.२५ टक्के इतकी रक्कम युक्रेनला देऊ केली, तरी ताज्या मदतनिधीच्या जवळपास तिप्पट भरते. पण कलास यांच्याइतके शहाणपण बाकीचे नेते दाखवू इच्छित नाहीत, ही समस्या आहे. अमेरिकेत तर या मुद्द्यावर याहूनही आनंद आहे. तेथे अध्यक्ष जो बायडेन युक्रेनला मदत करू इच्छितात, पण रिपब्लिकन सदस्यांना त्यातही शर्ती आणि अटी घुसडावयाशा वाटतात. तशात आता इस्रायल-हमास संघर्ष सुरू झाल्यानंतर मदत जुना मित्र इस्रायलला करायची की नवीन मित्र युक्रेनकडे पाठवायची या द्वंद्वामध्ये बायडेन प्रशासन अनेकदा अडकलेले दिसून येते. हा विलंब लक्षावधींसाठी जीवन-मरणातील फरक ठरू शकतो, हे संबंधितांनी ओळखायला हवे. रशियाची अर्थव्यवस्था युक्रेनपेक्षा १४ पटींनी मोठी आहे, शिवाय सैन्यदलांच्या बाबतीत रशिया दसपटीने अधिक ताकदवान आहे. परंतु युरोपातील मित्रदेशांची आणि अमेरिकेची ताकद युक्रेनला मिळाली, तर पारडे पूर्णपणे युक्रेनच्या बाजूकडे झुकते. मात्र मदत व ताकदीची ही जुळणी धिम्या गतीने आणि अपुऱ्या प्रमाणात होत आहे आणि याची किंमत युक्रेनला मोजावी लागत आहे. शिवाय रशियादेखील सोकावत आहे.

## संपादकीय »

### उद्योगी, उपेक्षित!

***आपल्या बदलत्या अर्थव्यवस्थेची दोन मुख्य प्रतीके. पेटीएम आणि बैजूज. पहिले फिन्टेक वर्गवारीत येते. म्हणजे फायनान्स आणि टेक्नॉलॉजी यांच्या संकरातून तयार झालेले नवे उद्योग.***

आपल्या बदलत्या अर्थव्यवस्थेची दोन मुख्य प्रतीके. पेटीएम आणि बैजूज. पहिले फिन्टेक वर्गवारीत येते. म्हणजे फायनान्स आणि टेक्नॉलॉजी यांच्या संकरातून तयार झालेले नवे उद्योग. तर दुसरे शिकवणी वर्गच; पण दूरस्थ तंत्रज्ञानाच्या मदतीने चालणारे. पारंपरिक शिकवणी वर्गात गुरुजी आणि विद्यार्थी समोरासमोर असतात. बैजूजने कोठूनही कोणत्याही वेळेस कोणालाही शिकवण्याचा मार्ग तंत्रज्ञानाच्या मदतीने उपलब्ध करून दिला.

ही दोनही क्षेत्रे आधुनिक आणि त्या आधुनिकतेस भारतीय वातावरणास साजेशी मुरड घालण्याचे कसब या दोघांचे. हल्ली असे काही नवे करणाऱ्यांचे कौतुक असे काही केले जाते की या कौतुकयात्रेत सामील न होणारे बाजारद्रोही, अर्थद्रोही आणि अंतिमत: देशद्रोही ठरवण्यापर्यंत मजल जाते. नव्यांचे कौतुक हवे हे खरेच.

**एका बोटावर मावेल एवढ्या आकाराच्या पण आत असलेल्या कोट्यवधी ट्रान्झिस्टर्सच्या आधारे उच्च कोटीची गणनक्षमता प्राप्त झालेल्या व त्यामुळेच संपूर्ण डिजिटल विश्वाचा आधारस्तंभ असलेल्या सेमीकंडक्टर चिपची निर्मितीप्रक्रिया ही आजघडीला पृथ्वीवर आढळणाऱ्या कोणत्याही मानवनिर्मित उत्पादनापेक्षा अधिक गुंतागुंतीची आहे.**

# चिप-चरित्र: अभियांत्रिकी चमत्कार!

या चिपची निर्मिती करणारा कारखाना हा उत्पादन क्षेत्रातील एक विलक्षण अभियांत्रिकी चमत्कार आहे असं म्हणणं अतिशयोक्ती ठरणार नाही. या कारखान्यांमधून वर्षाचे ३६५ दिवस, दिवसाचे २४ तास हजारोंच्या संख्येने चिपनिर्मिती अविरत सुरू असते. पण चिपची प्रत्यक्षात होणारी निर्मिती ही या प्रक्रियेची पहिली पायरी नाही. चिपनिर्मिती प्रक्रिया सुरू होते ती चिपच्या आरेखनकारांकडून (आर्किटेक्ट्स) चिपची संरचना (डिझाइन) बनविण्यापासून! एखादा स्थापत्यविशारद जसा इमारत उभारायच्या आधी तिची विस्तृत रूपरेषा (ब्लूप्रिंट) तयार करतो अगदी त्याचप्रमाणे चिप आर्किटेक्टदेखील प्रत्येक प्रकारच्या (लॉजिक चिप, मेमरी चिप वगैरे) आणि प्रत्येक आकाराच्या (ट्रान्झिस्टरची नॅनोमीटरमध्ये मोजलेली लांबी) चिपसाठी एक स्वतंत्र ब्लूप्रिंट तयार करतो. कोणत्याही चिपची उंची केवळ एका मिलिमीटर एवढी जरी असली तरीही आरेखनाच्या



दृष्टीने चिपची तुलना एका गगनचुंबी इमारतीशीच करता येईल. आज वापरात असलेल्या लॉजिक चिपमध्ये किमान ३० स्तर असतात, इथे एका स्तराची तुलना इमारतीच्या एका मजल्याशी करता येईल. प्रत्येक स्तरावर चिपच्या निरंतर कार्यक्षमतेसाठी उपयोगी असे विविध घटक (जसे ट्रान्झिस्टर्स, तारांच्या जोडण्या वगैरे) असतात, त्यांना तांत्रिक भाषेत 'इंटर-कनेक्ट्स' असं म्हटलं जातं. अक्षरश: नॅनोमीटरमध्ये लांबी व रुंदी असलेल्या अशा कोट्यवधी घटकांमुळे चिपनिर्मिती प्रक्रिया अत्यंत जटिल होऊन बसते. चिपच्या संरचनेची संगणकीय ब्लूप्रिंट घेऊन त्यांच्यामधून चिपआरेखनाचा एक काचेचा साचा (टेम्प्लेट) तयार केला जातो. साचा बनविण्याच्या या प्रक्रियेला 'मास्किंग' असं म्हटलं जातं. या साच्यांचा वापर करूनच पुढे चिपमध्ये असलेल्या इलेक्ट्रॉनिक सर्किटचा ठसा सिलिकॉनच्या चकत्यांवर उतरवला जातो.चिपची प्रत्यक्ष निर्मिती, जिला फॅब्रिकेशन असं संबोधलं जातं, ही संपूर्ण प्रक्रियेतील सर्वाधिक खर्चिक, वेळकाढू व जटिल पायरी आहे. आजघडीला चिपनिर्मितीचा एक कारखाना किंवा 'फॅब' उभारायचा खर्च हा १५०० ते २००० कोटी अमेरिकी डॉलर एवढा अतिप्रचंड आहे. एका फॅबमध्ये (जिचं क्षेत्रफळ हे सामान्यत: अडीच लाख स्क्वेअरफूट एवढं सहज भरेल) चिपनिर्मितीसाठी लागणारी जवळपास १२०० प्रमुख उपकरणं तर या प्रमुख उपकरणांच्या अविरत कार्यक्षमतेसाठी विविध सुविधा पुरवणारी जवळपास १५०० उपकरणं असतात.या अत्यंत महत्वाच्या प्रक्रियेबद्दल आपण पुढे जाणून घेणार आहोत) एका उपकरणाची किंमत सहज २० ते ३० कोटी अमेरिकी डॉलर एवढी भरते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# धरणं फोडणारे खेकडे एकत्र तिकडे गेले!

## 2014 आणि 2019 मध्ये माझा पाठिंबा का घेतला होतात?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभेच्या निवडणुका जाहीर झालेल्या नाहीत. आज सुट्टीचा दिवस नाही. तरीही इतक्या मोठ्या प्रमाणावर कुटुंबाशी संवाद साधायला आलोय. चिपळूणमध्ये प्रचाराची सभा घेतली नाही तरीही विजयी सभेला नक्की येणार असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. मी चिपळूण का और मेरा बहुत पुराना रिश्ता है असं कधीही सांगितलं नाही. रिश्ते सांगायचे नसतात उलट निभवायचे असतात, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी नरेंद्र मोदींवर टीका केली.**



संकट आलं तर त्याच्या छाताडावर चालून जा असं मला आजोबांनी सांगितलं होतं. संकट आलं की जे मुखवटे घातलेले कोण आणि खरे कोण? ते कळतं. सगळं देऊनही ज्यांची लाळ गळत असते ते लाळघोटे आज भाजपासह गेले आहेत असंही उद्धव ठाकरे चिपळूणच्या सभेत म्हणाले. चिपळूणमधले धरणं फोडणारे खेकडे एकत्र गेले आहेत. खेकडा तिरकाच चालणार, त्याचं काय करायचं तुम्हाला माहीत आहे. आज सोमवार आहे खेकड्याला सोडून द्या आज. अमावस्या, पौर्णिमा कधी आहे ते बघा असा टोलाही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. आपण सर्वोच्च न्यायालयात गेलो आहोत. न्याय मिळेल अशी अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाकडून आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या बरोबरीने सर्वात मोठं न्यायालय तुम्ही आहात, माझं जनता न्यायालय आहे असंही उद्धव ठाकरे म्हणाले. आज माझे हात रिकामे आहेत, तरीही तुम्ही सगळे आलात. एकही माणूस भाड्याने आणलेला नाही. सरकार आपल्या दारी म्हणत काही लोक येतात, त्यांच्या कार्यक्रमात अर्ध्या खुर्च्याही रिकाम्या असतात. भारतीय जनता पक्ष असं मी सभ्यपणे बोलतोय. बाळासाहेबांचे विचार सोडले असं जे म्हणतात त्यांना मी कमळाबाई म्हणतो. कमळाबाई शब्द बाळासाहेबांनी दिला. मी घराणेशाहीवाला आहे, बाळासाहेबांचे विचार माझ्याकडे आहेतच. पंतप्रधान घराणेशाहीच्या विरोधात जे टाहो फोडत आहेत त्यांना प्रश्न आहे २०१४ मध्ये मीच पक्षप्रमुख होतो, आत्ताचे जे सांगत आहेत की हे पक्षप्रमुखच नाहीत. मग तुम्ही पाठिंबा कुणाचा घेतला होता? २०१९ मध्ये मला तुम्ही का बोलवलं होतं? अमित शाह यांनी मला का बोलवलं होतं? अमित शाह मातोश्रीवर का आले होते? मिंध्याकडे का गेला नाहीत ? तोपर्यंत यांना माहीत होतं की हा पक्षप्रमुख आहे.घराणेशाहीबद्दल बोलणारा माणूस घरंदाज असला पाहिजे. त्याने त्याचं घर-दार कुटुंब व्यवस्थित सांभाळलं पाहिजे, मग तो माणूस घराणेशाहीवर बोलला तर मी समजू शकतो. २०१४, २०१९ ला घराणेशाही नव्हती का. ते जय श्रीराम म्हणत आहेत मी त्यांना हXXXX म्हणतो आहे. तुमचं भांडं जे जनतेच्या न्यायालयात आम्ही फोडलं, त्यानंतर काय म्हणणं आहे? शिवसेना कुणाची आहे? कळलं ना? यांचा कारभार कसा आहे. चोराला थोडीशी लाज असते. त्यामुळे ती म्हण आहे चोरीचा मामला आणि हळूहळू बोंबला. यांचं तसं नाही चोरीचा मामला आणि जोरजोरात बोंबला. मग मी त्यांना सांगेन की बोंबला आता होळी येतेच आहे. असं म्हणत उद्धव ठाकरेंनी भाजपावर जोरदार टीका केली.रामराज्य आल्याचे बोर्ड यांनी लावले आहेत. परवा यांच्या आमदारांनी जो गोळीबार केला त्याला हे रामराज्य म्हणत आहेत. अयोध्येत रामाचं मंदिर बांधलं आहे आणि राज्यांमध्ये आयारामांचं मंदिर बांधत आहेत, जेवढा मोठा चोर भाजपात जातो तेवढं मोठं पद त्याला मिळतं अशी टीकाही उद्धव ठाकरेंनी केली. लोकसभेच्या निवडणुका जाहीर झालेल्या नाहीत. आज सुट्टीचा दिवस नाही.

### मिंध्याकडे का गेला नाहीत ?

» संकट आलं की जे मुखवटे घातलेले कोण आणि खरे कोण? ते कळतं. सगळं देऊनही ज्यांची लाळ गळत असते ते लाळघोटे आज भाजपासह गेले आहेत असंही उद्धव ठाकरे चिपळूणच्या सभेत म्हणाले.चिपळूणमधले धरणं फोडणारे खेकडे एकत्र गेले आहेत. खेकडा तिरकाच चालणार, त्याचं काय करायचं तुम्हाला माहीत आहे. आज सोमवार आहे खेकड्याला सोडून द्या आज. अमावस्या, पौर्णिमा कधी आहे ते बघा असा टोलाही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. आपण सर्वोच्च न्यायालयात गेलो आहोत. न्याय मिळेल अशी अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाकडून आहे. आज माझे हात रिकामे आहेत, तरीही तुम्ही सगळे आलात. एकही माणूस भाड्याने आणलेला नाही. सरकार आपल्या दारी म्हणत काही लोक येतात, त्यांच्या कार्यक्रमात अर्ध्या खुर्च्याही रिकाम्या असतात.भारतीय जनता पक्ष असं मी सभ्यपणे बोलतोय. बाळासाहेबांचे विचार सोडले असं जे म्हणतात त्यांना मी कमळाबाई म्हणतो. कमळाबाई शब्द बाळासाहेबांनी दिला. मी घराणेशाहीवाला आहे, बाळासाहेबांचे विचार माझ्याकडे आहेतच. पंतप्रधान घराणेशाहीच्या विरोधात जे टाहो फोडत आहेत त्यांना प्रश्न आहे २०१४ मध्ये मीच पक्षप्रमुख होतो, आत्ताचे जे सांगत आहेत की हे पक्षप्रमुखच नाहीत. मग तुम्ही पाठिंबा कुणाचा घेतला होता? २०१९ मध्ये मला तुम्ही का बोलवलं होतं? अमित शाह यांनी मला का बोलवलं होतं? अमित शाह मातोश्रीवर का आले होते? मिंध्याकडे का गेला नाहीत ? तोपर्यंत यांना माहीत होतं की हा पक्षप्रमुख आहे.

---

# सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्याचं काम या सरकारने केलं

## मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकारकडून अधिसूचना

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकारकडून अधिसूचना काढण्यात आली आहे. सगेसोयऱ्यांना आरक्षण देण्यासह अनेक तरतुदी या अधिसूचनेत करण्यात आल्या आहेत. त्यामुळे ओबीसी समाजाचे नेते छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणाविरोधात आवाज उठवला. तसंच, मराठा आरक्षणाविरोधात त्यांनी ओबीसी एल्गार मोर्चालाही सुरुवात केली आहे.**





ठिकठिकाणी जाऊन ते ओबीसी समाजाचे मेळावे घेत असून सरकार आणि मराठा समाजातील नेत्यांवर हल्लाबोल करत आहेत. यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी टीका केली आहे. आज त्यांनी माध्यमांशी संवाद साधला."ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागणार असं देवेंद्र फडणवीसांनी आज नाही. मग ओबीसी समाजात जाऊन आरक्षण जाणार असं भूजबळ का सांगत आहेत? समाजातील लोकांना खोटं का बोलायचं? मराठा समाजाबद्दल मुख्यमंत्री बोलले तेही खोटंच आहे. कायदा बनवल्याशिवाय तुम्हाला मराठ्यांना आरक्षणच देता येणार नाही. पण दोन्ही समाजाला फुगे घेऊन उडवले आणि आता फोडून टाकत आहेत", अशी टीका जितेंद्र आव्हाडांनी केली.

"महाराष्ट्रातील सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्याचं काम या सरकारने केलं", असा थेट आरोपही त्यांनी यावेळी केला. ते पुढे म्हणाले, "न्हावी समाजाचा उल्लेख करून काय गरज होती बोलायची? ट्विटर, फेसबूकवरील गोष्टीत मोठ्यांनी लक्ष घालायचं का? जाता जात नाही ती जात म्हणतात. मीही ओबीसी आहे. मलाही माहितेय आमचं आरक्षण कोणाचं बाप काढू शकत नाही. पण ओबीसी समाज थोडा अशिक्षित आहे, अल्पसंख्याक असल्याने दबलेला असतो. त्यांच्या मानसिकतेचा फायदा घेऊन कोणी देशाचा नेता व्हायचा प्रयत्न करतंय आमच्या लक्षात येत नाहीय का? कोणाच्याही भावनांचा वापर करून माथी बिघडवू नका. ही फूट इतिहासात लिहली जाणार आहे", असंही जितेंद्र आव्हाड म्हणाले.

### आम्हाला मरण आलं तरी चालेल

» निकाल काय लागणार आहे हे आम्हाला माहितेय. आम्ही काय डरपोक नाही. आमदारकी गेली तर गेली. काय फरक पडतो? ज्या बापाने घडवलं त्या बापासाठी मरण आलं तर आम्हाला नाही फरत पडत. काही वाचवायचं म्हणून काही करायचं हे आमच्या ध्यानी- मनी- स्वप्नी नाही. शरद पवारांसाठी जीवही हजर आहे. जनतेला समजतं ना. जनता देईल परत निवडून आम्हाला", असंही जितेंद्र आव्हाड म्हणाले.मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकारकडून अधिसूचना काढण्यात आली आहे. सगेसोयऱ्यांना आरक्षण देण्यासह अनेक तरतुदी या अधिसूचनेत करण्यात आल्या आहेत. त्यामुळे ओबीसी समाजाचे नेते छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणाविरोधात आवाज उठवला. तसंच, मराठा आरक्षणाविरोधात त्यांनी ओबीसी एल्गार मोर्चालाही सुरुवात केली आहे.

# भाजपाचे अब की बार 400 पार!

## 370 जागा मिळण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदींना विश्वास

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत भाषण करत काँग्रेसची शाब्दिक धुलाई केली आहे. भारताचे दिवंगत पंतप्रधान पंडीत नेहरु आणि इंदिरा गांधी हे देशातल्या लोकांना कमी लेखत असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले आहेत. त्यासाठी त्यांनी या दोघांच्या भाषणांमधले उल्लेखही वाचून दाखवले. आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंनी अभिभाषण केलं. त्यानंतरच्या धन्यवाद प्रस्तावात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विरोधक आणि काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला.**



गुलाम नबी आझाद यांनी काँग्रेस पक्ष सोडला. मल्लिकार्जुन खरगे हे लोकसभेतून राज्यसभेत गेले. एकच प्रॉडक्ट वारंवार लाँच केल्याने काँग्रेसच्या दुकानाला कुलुप लागायची वेळ आली आहे. दुकान आम्ही म्हणत नाही. काँग्रेसचे लोक स्वतःच म्हणत आहेत. आमचं दुकान आहे याचा उल्लेख यांचेच लोक करतात. असं म्हणत नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधींच्या 'मोहब्बत की दुकान' शब्दावर टीका केली. आम्ही घराणेशाहीची चर्चा करतो कारण जो पक्ष कुटुंब चालवतं, कुटुंबातल्या लोकांनाच प्राधान्य देतं. कुटुंबच सगळे निर्णय घेतं त्याला आम्ही घराणेशाही म्हणतो. लोकशाहीत हे योग्य नाही. राजकारणात एका कुटुंबातले दहा लोक आले तरीही काहीच प्रश्न नाही. पण ते त्यांच्या प्रतिभेवर आणि लोकांनी दिलेल्या मतांवर निवडून आलेले हवेत, लादलेले नकोत असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे."देशातल्या कोट्यवधी जनतेने विकसित भारताची संकल्प यात्रा पाहिली आहे. भगवान राम हे फक्त आपल्या घरी परतले आहेतच. शिवाय अशा एका मंदिराची निर्मिती झाली आहे जे भारतीय संस्कृतीसाठी महत्त्वाचं आहे. आता आमच्या सरकारचा तिसरा कार्यकाळही दूर नाही. १०० ते १२५ दिवस बाकी आहे. अब की बार चारसो पार हे सगळं देश मानतो आहे. मी खरंतर मी इथल्या संख्येबाबत बोलत नाही. मात्र एनडीएला ४०० पार जागा मिळतीलच पण भाजपाला ३७० जागा या निवडणुकीत मिळतील." असा विश्वास आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे."आमचा तिसरा कार्यकाळ हा खूप मोठ्या निर्णयांचा असणार आहे. मी लाल किल्ल्यावरुन सांगितलं होतं आणि राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या वेळीही बोललो होतो. देशाला पुढच्या एक हजार वर्षांपर्यंत समृद्ध ठेवण्याची सुरुवात करणारा आमचा तिसरा कार्यकाळ असेल. एका समृद्ध देशाचा पाया रचणारा हा कार्यकाळ असणार आहे. माझा देशाच्या १४० कोटी भारतीयांवर खूप विश्वास आहे. मागच्या दहा वर्षात २५ कोटी लोक दारिद्र्यरेषेच्या बाहेर आले आहेत. गरीबांना जर साधन मिळालं, स्वाभिमान मिळालं तर गरीबीचा पराभव गरीब माणूस करतो. आम्ही तो मार्ग निवडला." असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.गुलाम नबी आझाद यांनी काँग्रेस पक्ष सोडला. मल्लिकार्जुन खरगे हे लोकसभेतून राज्यसभेत गेले. एकच प्रॉडक्ट वारंवार लाँच केल्याने काँग्रेसच्या दुकानाला कुलुप लागायची वेळ आली आहे. दुकान आम्ही म्हणत नाही. काँग्रेसचे लोक स्वतःच म्हणत आहेत. आमचं दुकान आहे याचा उल्लेख यांचेच लोक करतात. असं म्हणत नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधींच्या 'मोहब्बत की दुकान' शब्दावर टीका केली. आम्ही घराणेशाहीची चर्चा करतो कारण जो पक्ष कुटुंब चालवतं, कुटुंबातल्या लोकांनाच प्राधान्य देतं. कुटुंबच सगळे निर्णय घेतं त्याला आम्ही घराणेशाही म्हणतो. लोकशाहीत हे योग्य नाही. राजकारणात एका कुटुंबातले दहा लोक आले तरीही काहीच प्रश्न नाही. पण ते त्यांच्या प्रतिभेवर आणि लोकांनी दिलेल्या मतांवर निवडून आलेले हवेत, लादलेले नकोत असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे."देशातल्या कोट्यवधी जनतेने विकसित भारताची संकल्प यात्रा पाहिली आहे. भगवान राम हे फक्त आपल्या घरी परतले आहेतच. शिवाय अशा एका मंदिराची निर्मिती झाली आहे जे भारतीय संस्कृतीसाठी महत्त्वाचं आहे. आता आमच्या सरकारचा तिसरा कार्यकाळही दूर नाही. १०० ते १२५ दिवस बाकी आहे. अब की बार चारसो पार हे सगळं देश मानतो आहे. मी खरंतर मी इथल्या संख्येबाबत बोलत नाही. मात्र एनडीएला ४०० पार जागा मिळतीलच पण भाजपाला ३७० जागा या निवडणुकीत मिळतील." असा विश्वास आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे."आमचा तिसरा कार्यकाळ हा खूप मोठ्या निर्णयांचा असणार आहे. मी लाल किल्ल्यावरुन सांगितलं होतं आणि राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या वेळीही बोललो होतो.

### 100 ते 125 दिवस बाकी आहे

» गुलाम नबी आझाद यांनी काँग्रेस पक्ष सोडला. मल्लिकार्जुन खरगे हे लोकसभेतून राज्यसभेत गेले. एकच प्रॉडक्ट वारंवार लाँच केल्याने काँग्रेसच्या दुकानाला कुलुप लागायची वेळ आली आहे. दुकान आम्ही म्हणत नाही. काँग्रेसचे लोक स्वतःच म्हणत आहेत. आमचं दुकान आहे याचा उल्लेख यांचेच लोक करतात. असं म्हणत नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधींच्या 'मोहब्बत की दुकान' शब्दावर टीका केली. आम्ही घराणेशाहीची चर्चा करतो कारण जो पक्ष कुटुंब चालवतं, कुटुंबातल्या लोकांनाच प्राधान्य देतं. कुटुंबच सगळे निर्णय घेतं त्याला आम्ही घराणेशाही म्हणतो. लोकशाहीत हे योग्य नाही. राजकारणात एका कुटुंबातले दहा लोक आले तरीही काहीच प्रश्न नाही. पण ते त्यांच्या प्रतिभेवर आणि लोकांनी दिलेल्या मतांवर निवडून आलेले हवेत, लादलेले नकोत असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे."देशातल्या कोट्यवधी जनतेने विकसित भारताची संकल्प यात्रा पाहिली आहे. भगवान राम हे फक्त आपल्या घरी परतले आहेतच. शिवाय अशा एका मंदिराची निर्मिती झाली आहे जे भारतीय संस्कृतीसाठी महत्त्वाचं आहे. आता आमच्या सरकारचा तिसरा कार्यकाळही दूर नाही. १०० ते १२५ दिवस बाकी आहे. अब की बार चारसो पार हे सगळं देश मानतो आहे.

# निवडणुकीच्या कामात मुलांचा वापर केल्यास कारवाई

## » लोकसभा निवडणुक : निवडणूक आयोगाकडून नियमावली जारी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**केंद्रीय निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेतला आहे. निवडणुकीच्या संदर्भात कोणत्याही कामात लहान मुलांचा वापर न करण्याचे निर्देश आयोगाने सर्व राजकीय पक्षांना दिले आहेत. राजकीय पक्षांनी पोस्टर्स, पॅम्प्लेट वाटप, प्रचार रॅली आणि निवडणूक सभांसह कोणत्याही स्वरूपातील निवडणूक प्रचारात लहान मुलांचा वापर करू नये असं आयोगाने म्हटलं आहे.**

तसं आढळल्यास राजकीय पक्षांसोबत प्रशासकीय अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही दिला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीसंदर्भात नियमावली जाहीर केली आहे. निवडणुकीच्या कोणत्याही कामात लहान मुलांचा वापर करण्याबाबत कडक निर्देश जारी करण्यात आले आहेत. पोस्टर आणि पॅम्प्लेटमध्ये प्रचारासाठी कोणत्याही स्वरूपात लहान मुलांचा वापर करण्यास मनाई केली आहे. राजकीय पक्षांना पाठवलेल्या अ‍ॅडव्हायझरीमध्ये,




निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रियेदरम्यान पक्ष आणि उमेदवारांकडून कोणत्याही प्रकारे लहान मुलांचा वापर करू नये, अन्यथा कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला आहे. आयोगाने त्याच्या नियमावलीत म्हटलं आहे की, ही नियमावली कविता, गाणे, उच्चारलेले शब्द, राजकीय पक्षाचे प्रदर्शन किंवा उमेदवाराचे चिन्ह यासह कोणत्याही स्वरूपात राजकीय प्रचारासाठी मुलांच्या वापरावर लागू होते. कोणत्याही राजकीय पक्षाच्या निवडणूक प्रचाराच्या कार्यात सहभागी नसलेला नेता आणि एखादे मूल त्याच्या आई-वडिलांसह किंवा पालकांसह केवळ त्यांच्या जवळच असेल, तर अशा परिस्थितीत ते मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन मानले जाणार नाही.

### हनीट्रॅप म्हणजे काय?

» राजकीय पक्षांना कोणत्याही निवडणुकीत मुलांना सहभागी न करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच रॅली, घोषणाबाजी, पोस्टर्स वाटप यासह प्रचारापासून मुलांना दूर ठेवण्याचे आदेश दिले.

» याशिवाय राजकीय नेते आणि उमेदवारांना निवडणूक प्रचार किंवा रॅलीदरम्यान लहान मुलाला त्यांच्या वाहनात ठेवण्याची किंवा नेण्याची परवानगी नाही.

» निवडणुकीत लहान मुलांचा इतर कोणत्याही प्रकारे वापर करण्यास बंदी घातली आहे.

» पालकांसोबतची उपस्थिती ही निवडणूक आयोगाने मुलांसाठी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन मानलं जाणार नाही.

# फुले-शाहू-आंबेडकर हे नाव दमात का घ्यायचं?

मराठी अभिनेता किरण मानेंची सोशल मीडियावरील पोस्ट चांगल्याच चर्चेत असतात. राजकारणात प्रवेश केल्यानंतर किरण माने यांच्या पोस्टची अधिकच चर्चा होऊ लागली आहे. अमळनेर येथे पार पडलेल्या विद्रोही साहित्य संमेलनात किरण माने हे एका परिसंवादात सहभागी झाले होते. या विद्रोही साहित्य संमेलनात आलेल्या संमेलनात आलेल्या अनुभवावर किरण माने यांनी पोस्ट लिहिली. द्वेष पसरवणाऱ्या भवतालात लोकांना प्रेमाचा संदेश भावतो यासारखं सुख नसल्याचे किरण माने यांनी म्हटले. किरण माने यांनी आपल्या पोस्ट मध्ये म्हटले



की, प्रत्येक कलाकाराची इच्छा असते आपण लोकप्रिय व्हावं. लोकांचा 'आवडता' व्हावं. मला या गोष्टी या दोन वर्षांत भरभरून मिळाल्या. माझ्यावर जीव लावणारे, मनापासून प्रेम करणारे लाख्खो लोक महाराष्ट्रभरात आहेत. रोज महाराष्ट्रभरातल्या वेगवेगळ्या गांवातनं वेगवेगळ्या समारंभासाठी निमंत्रण घेऊन मला किमान पंचवीस फोन्स येतात. प्रत्येक ठिकाणी नाही जाऊ शकत मी. पण जिथे जाईन तिथे हजारोंच्या संख्येनं लोक आलेले असतात. प्रत्येकाला मला आपुलकीनं पर्सनली भेटायचं असतं. हे सगळं पाहून मन भरून येतं. कुणी कितीही बदनाम करायचा प्रयत्न करूदेत, चांगुलपणाचा आणि प्रामाणिकपणाचा विजय होतो यावरचा विश्वास दृढ होतो !

# बेबी जॉन'चा खतरनाक फर्स्ट लूक

सध्या रुपेरी पडद्यावर ॲक्शन चित्रपटांची लाट आली आहे. बॉक्स ऑफिसवर ॲक्शनपट धुमाकूळ घालत आहेत. बॉक्स ऑफिसवर कमाईचा डोंगर रचणारा दिग्दर्शक ॲटली आता पुन्हा एकदा आपली जादू दाखवण्यास सज्ज झाला आहे. बेबी जॉन ( BABY JONN) या चित्रपटाचा फर्स्ट लूक व्हिडिओ लाँच करण्यात आला आहे. या चित्रपटात वरूण धवनची (VARUN DHAWAN) मुख्य भूमिका आहे. या 60 सेकंदाच्या व्हिडीओत वरूण धवनचा लूक अंगावर काटे आणणारा आहे. ॲटली या चित्रपटाचा सादरकर्ता आहे. या चित्रपटात वरुण धवनसह कीर्ती सुरेश (KEERTHY SURESH) आणि वामिका गब्बी (WAMIQA GABBI ) यांच्याही भूमिका आहेत. बॉलिवूड आणि टॉलीवूड सिनेसृष्टीचा हा तडका 2024 मध्ये बॉक्स ऑफिसवर कमाल करणार असल्याचे बोलले जात आहे. वरुण धवन बऱ्याच काळानंतर 'बेबी जॉन'मध्ये दमदार ॲक्शन अवतारात दिसणार आहे. फर्स्ट लूक व्हिडिओमध्ये त्याची स्टाइल खतरनाक आणि ॲग्रेसिव्ह आहे. यापूर्वी या चित्रपटाचे नाव ठरले नव्हते. त्यामुळे VD18 म्हणून त्याची जाहिरात केली जात होती. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान वरुणच्या पायाला दुखापत झाली होती.



# सई ताम्हणकर नव्या रिलीजसाठी सज्ज

'श्री देवी प्रसन्न' च्या रिलीज नंतर सई ताम्हणकर पुन्हा एकदा आपल्या अभिनयाची जादू दाखवण्यासाठी सज्ज होताना दिसते आहे. मागच्या आठवड्यात सईचा 2024 मधला पहिला मराठी चित्रपट रिलीज झाला आणि आता या आठवड्यात सई पुन्हा एकदा नेटफ्लिक्स वरच्या 'भक्षक' मध्ये दिसणार आहे. या चित्रपटात सई जस्मीत गौर या एका पोलिस अधिकाऱ्याची ची भूमिका साकारणार आहे. 'भक्षक' या चित्रपटाच्या माध्यमातून भूमी पेडणेकर , सई ताम्हणकर आणि संजय मिश्रा हे मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. सईने आजवर वैविध्यपूर्ण भूमिका साकारून तिच्या अभिनयाची चुणूक दाखवून दिली आहे आणि आता हा नवा रोल सई कसा साकारणार हे बघण उत्कंठावर्धक असणार आहे. 'भक्षक'मध्ये भूमी सई ताम्हणकर एका महिला पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारणार तर आहेच, पण पुन्हा एकदा बॉलिवूडमधल्या बड्या कलाकारांसोबत ती ओटीटीवर दिसणार आहे. अल्पवयीन मुलींवर होणारे अन्याय आणि अत्याचार यामुळे त्यांना कोणत्या परिस्थितीला सामोरे जावे लागते यावर या चित्रपटातून भाष्य करण्यात आले आहे. 'भक्षक'च्या ट्रेलर ट्रेलरला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आणि आता 9 फेब्रुवारी ला भक्षक नेटफ्लिक्सवर रिलीज होणार आहे.सई पहिल्यांदाच रेड चिली एंटरटेनमेंटसोबत हा खास प्रोजेक्ट करणार आहे आणि तिच्यासाठी हा चित्रपट खूप खास आहे. वर्षभरात सई नेहमीच वेगवेगळ्या प्रोजेक्टमधून प्रेक्षकांचं मनोरंजन करणार आहे. जस्मीत गौरला बघण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत.



# जान्हवीने बॉयफ्रेंडच्या आईला दिल्या शुभेच्छा

जान्हवी कपूर ही बॉलीवूडमधील आघाडीची अभिनेत्री आहे. आपल्या फॅशनमुळे चर्चेत असणारी जान्हवी सध्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. जान्हवीने शिखर पहारियाबरोबर रिलेशनशिपमध्ये असल्याची कबुली दिली आहे. अलीकडेच ‘कॉफी विथ करण’ मध्ये जान्हवीने हजेरी लावली होती. तेव्हाच तिने शिखरबरोबरच्या नात्याबद्दल शिक्कामोर्तब केलं. शिखरचा भाऊ वीर व आई स्मृती शिंदे यांच्या एका फोटोवर जान्हवीने केलेली कमेंट सध्या चर्चेत आहे.शिखर पहारियाची आई म्हणजेच स्मृती शिंदे यांचा ४ फेब्रुवारीला वाढदिवस होता. या निमित्ताने शिखरचा भाऊ वीर याने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर एक फोटो पोस्ट केला. वाढदिवसाच्या शुभेच्छा देत वीर पहारियानं त्याचा आणि त्याच्या आईचा आताचा आणि लहाणपणीचा फोटो शेअर केला. यावर जान्हवीने ‘बेस्ट पीपल’ अशी कमेंट करत आपल्या भावना व्यक्त केल्या. तर ओरीने ‘आय मिस हर’ अशी कमेंट केली. जान्हवीसह इतर कलाकारांनीसुद्धा त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.पहारिया भावंडाची चर्चा अनेकदा ‘कॉफी विथ करण’ च्या एपिसोडमध्ये झाली आहे. यावेळी शोमध्ये जान्हवी शिखरबद्दल मनमोकळेपणाने बोलताना दिसली. शिखरने तिला कसा पाठिंबा दिला.

# इंग्लंडचा 106 धावांनी उडवला धुव्वा!

## अश्विन कसोटी 500 विकेट्स घेण्यापासून एक विकेट दूर राहिला

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**विशाखापट्टणम येथे भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसरा कसोटी सामना सोमवारी पार पडला. या सामन्यात भारताने इंग्लंडचा १०६ धावांनी धुव्वा उडवला. त्याचबरोबर पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. भारतीय संघाच्या या विजयात यशस्वी जैस्वाल, शुबमन गिल आणि जसप्रीत बुमराह यांनी मोलाचे योगदान दिले. हैदराबादमध्ये झालेली पहिली कसोटी इंग्लंडने २८ धावांनी जिंकली होती.**

भारताने पहिल्या डावात जैस्वालच्या द्विशतकाच्या जोरावर ३९६ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात इंग्लंडचा डाव २५३ धावांवर आटोपला. त्यामुळे भारताला १४३ धावांची आघाडी मिळाली. यानंतर भारताने दुसऱ्या डावात शुबमनच्या शतकी खेळीमुळे २५५ धावा केल्या. त्याचबरोबर इंग्लंडसमोर विजयासाठी ३९९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात इंग्लंडचा संघ २९२ धावांवर आटोपला. इंग्लंडसाठी दुसऱ्या डावात झॅक क्रॉऊलीने सर्वाधिक ७३ धावांचे योगदान दिले. त्याचबरोबर पहिल्या डावातही त्याने ७६ धावांचे योगदान दिले होते.जसप्रीत बुमराहने टीम इंडियासाठी गोलंदाजीत कमाल केली. या सामन्यात त्याने ९ विकेट्स घेतल्या. बुमराहने पहिल्या डावात ६ आणि दुसऱ्या डावात ३ विकेट्स घेतल्या. तर कुलदीपने एकूण ४ विकेट घेतल्या. रविचंद्रन अश्विन आणि मुकेश कुमारने ३-३ विकेट्स घेतल्या. इंग्लंडकडून जेम्स अँडरसन, रेहान अहमद आणि शोएब बशीर यांनी पहिल्या डावात प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. टॉम हार्टलेने दुसऱ्या डावात ४ विकेट्स घेतल्या. रेहानने ३ आणि अँडरसनला २ विकेट्स मिळाल्या.३९९ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडचा संघ खूपच कमकुवत दिसत होता. संघाची सुरुवात चांगली झाली होती बेन डकेट आणि जॅक क्रॉलीने पहिल्या विकेटसाठी ५० धावांची भागीदारी केली. यानंतर जॅक




क्रॉली आणि रेहान अहमद यांनी मिळून दुसऱ्या विकेटसाठी ४५ धावांची भागीदारी केली. लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडने २१.५ षटकांत ९५ धावांत २ विकेट गमावल्या. संघाला पहिला धक्का बेन डकेटच्या रूपाने बसला, त्याने ६ चौकारांच्या मदतीने २८ धावा केल्या. याशिवाय दुसरा धक्का रेहान अहमदच्या रूपाने बसला, ज्याने ५ चौकारांसह २३ धावा केल्या. यानंतर सातत्यान विकेट्स पडत राहिल्याने त्यांना लक्ष्यापर्यंत पोहोचणे अवघड झाले.विशाखापट्टणम येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या कसोटीत भारताने इंग्लंडचा १०६ धावांनी पराभव केला आहे. यासह टीम इंडियाने पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत पुनरागमन करत मालिकेत १-१अशी बरोबरी साधली आहे. इंग्लंडने पहिली कसोटी २८ धावांनी जिंकली. मात्र, दुसऱ्या कसोटीत भारतीय गोलंदाजांनी इंग्लंडच्या बॅझबॉलवर मात केली. या सामन्यात अनुभवी फिरकीपटू रविचंद्रनने ३ विकेट्स घेत एका मोठ्या विक्रमाला गवसणी घातली.या सामन्यातील दुसऱ्या डावात ऑली पोपला बाद करुन एक मोठा पराक्रम केला. तो आता भारताकडून इंग्लंडविरुद्ध कसोटीत सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज बनला आहे. त्याने भागवत चंद्रशेखर यांचा विक्रम मोडला आहे. चंद्रशेखर यांनी इंग्लंडविरुद्धच्या कसोटी सामन्यात ९५ विकेट्स घेतल्या आहेत. अनिल कुंबळे ९२ विकेट्ससह तिसऱ्या स्थानावर आहे. अनुभवी फिरकी गोलंदाज बिशनसिंग बेदी आणि कपिल देव तिसऱ्या क्रमांकावर आहेत. या दोघांनी इंग्लंडविरुद्ध ८५-८५ विकेट्स आपल्या नावावर केल्या आहेत.या सामन्यात रविचंद्रन अश्विनला कसोटी क्रिकेटमध्ये आपल्या पाचशे विकेट्स पूर्ण करण्याची संधी होती. मात्र, तो आता एक पाऊल दूर राहिला आहे. रविचंद्रन अश्विनने २०११ मध्ये भारतीय कसोटी संघात पदार्पण केले. तेव्हापासून तो भारतीय फिरकी गोलंदाजीतील महत्त्वाचा दुवा राहिला आहे. त्याने टीम इंडियासाठी ९७ कसोटी सामन्यात ४९९ विकेट्स घेतल्या आहेत. याशिवाय त्याने एकदिवसीय सामन्यात १५६ आणि टी-२० सामन्यात ७२ विकेट्स घेतल्या आहेत. सामन्याबद्दल बोलायचे, तर भारताने पहिल्या डावात जैस्वालच्या द्विशतकाच्या जोरावर ३९६ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात इंग्लंडचा डाव २५३ धावांवर आटोपला. त्यामुळे भारताला १४३ धावांची आघाडी मिळाली. यानंतर भारताने दुसऱ्या डावात शुबमनच्या शतकी खेळीमुळे २५५ धावा केल्या. त्याचबरोबर इंग्लंडसमोर विजयासाठी ३९९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात इंग्लंडचा संघ २९२ धावांवर आटोपला.

### झॅक क्रॉऊलीने सर्वाधिक 73 धावा

भारताने पहिल्या डावात जैस्वालच्या द्विशतकाच्या जोरावर ३९६ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात इंग्लंडचा डाव २५३ धावांवर आटोपला. त्यामुळे भारताला १४३ धावांची आघाडी मिळाली. यानंतर भारताने दुसऱ्या डावात शुबमनच्या शतकी खेळीमुळे २५५ धावा केल्या. त्याचबरोबर इंग्लंडसमोर विजयासाठी ३९९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात इंग्लंडचा संघ २९२ धावांवर आटोपला. इंग्लंडसाठी दुसऱ्या डावात झॅक क्रॉऊलीने सर्वाधिक ७३ धावांचे योगदान दिले. त्याचबरोबर पहिल्या डावातही त्याने ७६ धावांचे योगदान दिले होते. जसप्रीत बुमराहने टीम इंडियासाठी गोलंदाजीत कमाल केली.

# रचिन रवींद्रने द्विशतक झळकावत रचला इतिहास!

## रचिन रवींद्रने यशस्वी जैस्वालला मागे टाकत मोडले अनेक विक्रम

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला कसोटी सामना माऊंट मौनगानुई येथे खेळला जात आहे. या सामन्यात एकदिवसीय विश्वचषक २०२३ मध्ये आपली छाप पाडणारा युवा फलंदाज रचिन रवींद्रने पहिल्या डावातच द्विशतक झळकावले. कारकिर्दीतील चौथा सामना खेळत असलेल्या रचिनने ३६६ चेंडूत २४० धावांची उत्कृष्ट खेळी खेळली. रचिन रवींद्रच्या या दमदार खेळीमुळे न्यूझीलंडला पहिल्या डावात ५११ धावा करता आल्या.**




तसेच, रचिन रवींद्रच्या या द्विशतकानंतर त्याने अनेक विक्रमही आपल्या नावावर केले. रचिन रवींद्रने कारकिर्दीतील चौथ्या कसोटी सामन्यात अनेक मोठे विक्रम मोडीत काढले आहेत. यादरम्यान त्याने २६ चौकार आणि ३ षटकार मारले. रचिन रवींद्रने कसोटीत १०० धावांचा टप्पा ओलांडण्याची ही पहिलीच वेळ होती आणि त्याचे दुहेरी शतकात रूपांतर करण्यातही त्याला यश आले. आपल्या पहिल्या कसोटी शतकाचे दुहेरी शतकात रूपांतर करणारा रचिन रवींद्र हा न्यूझीलंडचा चौथा खेळाडू ठरला. याआधी न्यूझीलंडचे केवळ ३ खेळाडू ही कामगिरी करू शकले होते.रचिन रवींद्रने आता वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२५ सायकलमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम केला आहे. रचिन रवींद्रने २४० धावांची खेळी करत यशस्वी जैस्वालचा विक्रम मोडला. इंग्लंडविरुद्ध खेळल्या जात असलेल्या विशाखापट्टणम कसोटी सामन्यात त्याने २०९ धावांची खेळी खेळली, जी २०२३-२५ च्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमधील सर्वोच्च खेळी होती.रचिन कसोटीत द्विशतक झळकावणारा न्यूझीलंडचा दुसरा सर्वात तरुण फलंदाज ठरला आहे. याआधी केन विल्यमसन दुसऱ्या स्थानावर होता.

### 2023-25 मधील सर्वात मोठी इनिंग

न्यूझीलंडसाठी कसोटीत सर्वात कमी वयात द्विशतक झळकावण्याचा विक्रम मॅथ्यू सिंक्लेअरच्या नावावर आहे. सिंक्लेअरने १९९९ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या पदार्पणाच्या सामन्यात द्विशतक झळकावले होते.मॅथ्यू सिंक्लेअरने वेस्ट इंडिजविरुद्ध २१४ धावा केल्या होत्या. आपल्या पहिल्या कसोटी शतकाचे दुहेरी शतकात रूपांतर करणारा रचिन हा न्यूझीलंडचा चौथा फलंदाज आहे. तसेच, कसोटीच्या पहिल्या डावात सर्वाधिक २४० धावा करणारा रचिन रवींद्र आता न्यूझीलंडचा पहिला फलंदाज ठरलाआहे. ज्याने पहिल्या डावात सर्वात मोठी खेळी साकारली आहे.